ॐ

# सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज, कल्याण

(न्यास नोंदणी क्र. ए-४३ ठाणे)

कार्यालय - श्री मुरलीधर मंदिर देवस्थान, अहिल्यादेवी चौक,
कल्याण (प.) दूरध्वनी क्र. ०२५१-२२०९२१५



# माहिती पत्रक

## कल्याण समाजाचे संस्थापक अध्यक्ष व मार्गदर्शक आदरणीय



कै.बाबुराव बंडोबा जाधव



कै.निलकंठ महादेवराव कांबळे



कै.भालचंद्र बाबुराव कंगले

# सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज, कल्याण

(न्यास नोंदणी क्र. ए-४३ ठाणे)
कार्यालय - श्री मुरलीधर मंदिर देवस्थान, अहिल्यादेवी चौक,
कल्याण (प.) दूरध्वनी क्र. ०२५१-२२०१२१५

सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज ट्रस्ट, कल्याणची स्थापना १९५३ साली झाली. ट्रस्ट च्या नोंदणी क्रमांक ए-४३ ठाणे असा आहे.

स्थापनेपासून आजपर्यंत प्रमुख विश्वस्त व अध्यक्ष म्हणून कै.बाबुराव बंडोबा जाधव (संस्थापक), निळकंठ महादेव कांबळे, कै.बळवंतराव रामचंद्र ओतुरकर, कै.भालचंद्र बाबुराव कंगले यांनी तन-मन-धन खर्च करून कल्याण, डोंबिवली, ठाणे पासून कर्जत, कसारा, वसई, विरार, पनवेल व नवी मुंबई पर्यंत पसरलेल्या आपल्या समाज बांधवांना एकत्र आणून, त्यांच्या उन्नतीसाठी अपार कष्ट केले आहेत. हे आपण जाणता आहात.

फेब्रुवारी २०१३ मध्ये प्रमुख विश्वस्त व अध्यक्ष श्री.भा.बा.कंगले यांच्या अकाली निधनामुळे, तसेच अन्य विश्वस्त वयोवृध्द झाल्यामुळे त्यांच्या इच्छेनुसार नविन विश्वस्तांनी ट्रस्ट ची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. प्रमुख विश्वस्त व अध्यक्ष ॲड.श्री.मोहनराव नरसिंगराव पिंपळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली ट्रस्टचे कार्य पुन्हा जोमाने सुरू झाले.

कल्याण सारख्या ऐतिहासीक वारसा लाभलेल्या शहरात आपल्या समाजाच्या दोन मिळकती (Properties) मोक्याच्या जागी मध्यवर्ती ठिकाणी आहेत. त्याचा तपशील असा.

१) चिकणघर सर्वे क्र. ३८, कल्याण येथे २ एकर २.२५ गुंठे जागा असून त्यापैकी १३,००० स्क्वेअर फूट जागा मोकळी असून समाजाच्या ट्रस्टच्या ताब्यात आहे.

२) अहिल्याबाई चौक, सिटी सर्वे क्र. २३६५ आणि २३६६, कल्याण येथील

श्री मुरलीधराचे मंदिर आपल्या समाजाचे आहे. मंदिराभोवती १३ अनधिकृत भाडेकरू (दुकाने व रहाण्याच्या खोल्या) बळकावून आहेत. १९८८ पासून या भाडेकरूंवर जागा खाली करण्यासाठी कल्याणच्या दिवाणी न्यायालयात दावे दाखल आहेत. या १३ केसेस पैकी ११ केसेसचा निकाल सप्टेंबर २०१५ मध्ये आपल्या बाजूने लागला आहे. उरलेल्या दोन्ही केसेसही लवकरच सुटतील व संपूर्ण जागा आपल्या समाजाच्या ट्रस्टच्या ताब्यात येईल.

१९८८ मध्ये या अनधिकृत भाडेकरूंवर ॲडवोकेट नारायण अडवाणी द्वारा कल्याणच्या दिवाणी न्यायालयात दावे दाखल केले होते. कालांतराने ॲड.नारायण अडवाणीचे निधन झाल्यावर त्यांचे पुत्र अशोक नारायण अडवाणी, ॲड.श्रीमती विद्या ना.अडवाणी, ॲड. श्रीमती भावना अहुजा व ॲड. श्री.योगेश कुलकर्णी, उल्हासनगर या निष्णात वकील मंडळींनी आपली बाजू न्यायालयात खंबीरपणे मांडून ११ केसेसचा निकाल आपल्या बाजूने मिळवून दिला. या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यासाठी आपल्या समाजाचे आता पर्यंत १२ लाख रुपये खर्च झालेत या न्यायालयीन लढ्यात आपले समाजाचे वकील श्री.नवीन रमेश वांद्रेकर सहाय्य करीत आहेत.

**सो.आ.क्ष समाज ट्रस्ट कल्याणची / दोन अभिमानास्पद ठळक कार्ये**

(Achivements )

**१) सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाला महाराष्ट्र सरकार द्वारा, भटकी जमात NOMADIC TRIBE म्हणून मान्यता :** सो.आ.क्ष.समाज कल्याणचे उपाध्यक्ष श्री.राम गोपाळ डांगे आणि कार्यकारिणी मंडळाच्या सदस्यांनी आपल्या समाजाचे ८०-९० वर्षां पूर्वीच्या इतिहासाचे दाखले व अनुषंगीक कागदपत्रांची जुळवाजुळव व पूर्तता करून महाराष्ट्र सरकारकडून सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज ला भटकी जमात NOMADIC TRIBE म्हणून मान्यता मिळवून दिली. या साठी सो.आ.क्ष.समाज, कल्याणचे उपाध्यक्ष,श्री.राम गोपाळ डांगे व कार्यकारिणी मंडळाच्या सदस्यांनी सतत ३ वर्षे सरकारी दरबारी अनेक खेटे घालून व रु.२ लाख पर्यंतची पदरमोड करून ही



मान्यता मिळवूनं दिली. महाराष्ट्र सरकारने या मान्यतेचा जी.आर.ही काढला त्याचा क्रमांक असा. सी.बी.सी-१०/२०१४/प्र.क्र.८८/मावक दि. ४ सप्टेंबर २०१४ आहे हे नमूद करण्यास सो.आ.क्ष समाज ट्रस्ट, कल्याणला अभिमान वाटतो.

याचा फायदा महाराष्ट्रातील आपल्या सर्व समाज बांधवांना शिक्षण, नोकरी, प्रमोशन, सरकारी कोठ्यातून गृह संकुले, तसेच विविध सरकारी सवलतींचा फायदा मिळविण्यास होणार आहे. या कामासाठी आवश्यक असलेले दाखले कल्याण समाजाच्या कार्यालयातून देण्यास सुरूवात झालेली आहे. इच्छुक समाज बांधव याचा लाभ घेवू शकतात. या गोष्टीचे अनुकरण महाराष्ट्रातील अन्य शहरातील सो.आ.क्ष समाजाची कार्यालये करीत आहेत.

**२) अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा.**

गेल्या २७ वर्षांत अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा झालीच नव्हती. सो.आ.क्ष. समाज ट्रस्ट, कल्याणने पुढाकार घेऊन. दि.३१ मे व १ जून २०१४, या दिवशी कल्याण मध्ये 'वार्षिक सर्वसाधारण सभा' घेण्यास 'अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाला' भाग पाडले. या अधिवेशनासाठी आपल्या सो.आ.क्ष. समाज ट्रस्ट कल्याणच्या सर्व विश्वस्तांनी, कार्यकारिणी मंडळातील सदस्यांनी व सभासदांनी पुढाकार घेवून, सर्व समाजाला आदर्शवत होईल असे अधिवेशन घेवून पार पाडले. या दोन दिवसांच्या अधिवेशनासाठी संपूर्ण भारतातून ६०० च्या वर समाजबांधव व पदाधिकारी उपस्थित होते. या अधिवेशनासाठी झालेला सुमारे १० लाख रुपये खर्च कल्याण समाजाने स्वबळावर उभा केला हे आपण जाणता आहात.

**उपक्रम**

**१) वार्षिक उत्सव व कार्यक्रम :-**

सो.आ.क्ष. समाज ट्रस्ट कल्याण तर्फे मुरलीधर मंदिर येथे वर्षभरात ३५ च्या वर कार्यक्रम व उत्सव साजरे केले जातात. त्यात प्रामुख्याने श्रीकृष्ण

जन्माष्टमी, नववर्ष दिन (गुढीपाडवा), दसरा, वार्षिक सत्यनारायण पुजा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, समाजातील वृध्दांचा सत्कार इत्यादी. याचा खास उल्लेख करावा लागेल.

**२) आरोग्य शिबीर :-**

समाज बांधवांसाठी मोफत नेत्र चिकित्सा व रक्तदान शिबीर आयोजित केले जाते.

**३) वाचनालय :-**

समाजातर्फे मुरलीधर मंदिर येथे सुसज्ज वाचनालय सुरू आहे. महाराष्ट्र सरकारच्या ऑडीटर्सनी वाचनालयाच्या कार्याचा पुरस्कार देऊन गौरव केला आहे. श्री.रमेश दत्तात्रय भिसे, उपाध्यक्ष हे वाचनालयाची धुरा समर्थपणे सांभाळतात. महाराष्ट्र सरकारने २०१४ चे 'उत्कृष्ट ग्रंथपाल' म्हणून त्यांना सन्मानित केले आहे. हे वाचनालय अनेक विषयांवरील पुस्तकांनी समृध्द असून आपले समाज बांधव याचा लाभ घेत असतात.

**४) महिला बचत गट :-**

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी महिला बचत गटाची बैठक मुरलीधर मंदिर येथे होत असते. या बचत गटातर्फे अनेक चांगले समाजाभिमुख कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे समाजातील अनेक महिला एकत्र येतात व विधायक कार्याला जोडून घेतात.

**५) कायदे विषयक मोफत सल्ला व समुपदेशन :-**

समाज बांधवांसाठी कायदे विषयक मोफत सल्ला दिला जातो. गृहकलह निर्माण झाल्यास ते मिटविण्यासाठी तज्ज्ञांद्वारे समुपदेशन केले जाते. असे अनेक गृहकलह मिटविण्यास सो.आ.क्ष समाज कल्याणला यश प्राप्त झाले आहे. या कामी समाजातील निष्णात वकिल व डॉक्टर मंडळी सहाय्य करतात.

**६) उपवर वधु-वर स्थळांची सूची :-**



उपवर वधु-वरांची स्थळे सुचविण्याचे कार्य श्री.संजय ओतूरकर, उपाध्यक्ष डोंबिवली व सौ.वैशाली औटी, सचिव कल्याण हे निरलसपणे करीत आहेत. आपणही याचा लाभ घेवू शकता.

७) कल्याण येथील श्री.मधुकर दिवेकर व सौ.जयश्री म. दिवेकर यांची कन्या कु.स्वानंदा हिचा विवाह पुण्याच्या श्री.समर्थ खापरे यांच्याशी वधु-वर समिती प्रमुख श्री.संजय ओतुरकर, डोंबिवली यांच्या प्रयत्नाने ठरला व कल्याण समाज बंधु-भगिनींच्या सहकार्याने श्री.मुरलीधर मंदिर, कल्याण येथे दि.३ जानेवारी २०१६ रोजी हा विवाह संपन्न झाला. समाजातर्फे विवाह लावून देणे या उपक्रमांतील हा पहिला विवाह झाला.

**८) कल्याण समाजाची ज्ञाती-सूची :-**

कल्याण समाजाची ज्ञाती-सूची तयार करण्याचे काम सुरू असून लवकरच पूर्णत्वास जाईल व सूची आपल्या हाती पडेल. समाजाचे कार्यकर्ते घरोघरी फिरून ज्ञाती बांधवांची माहिती गोळा करीत आहेत. आपणापर्यंत कार्यकर्ते पोहोचले नसल्यास आपण समाजाच्या कार्यालयात ही माहिती त्वरीत पाठवावी

**९) सहल-पिकनीक :-**

ना नफा - ना तोटा या तत्वावर वर्षातून एकदा धार्मिक क्षेत्री समाज बंधु-भगीनींसाठी सहल आयोजित केली जाते. गेल्यावर्षी देहू-आळंदी येथे सहल आयोजित केली होती. यात ३५ समाजबंधु-भगिनीं सहभागी झाले होते.

**१०) मान-सन्मान सत्कार :-**

अन्य शहरातील सो.आ.क्ष. समाजाच्या शाखांमधून कल्याण समाजाला भेट देणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा यथोचित सन्मान व आदरातिथ्य केले जाते. तसेच विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा ही सत्कार केला जातो.

**११) मासिक सभा :-**

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी संध्या. ५.०० वा. मुरलीधर मंदिर येथे मासिक

सर्वसाधारण सभा घेतली जाते. या सभेत मागील कार्याचा आढावा घेतला जातो व पुढील कार्यक्रमांची रुपरेषा निश्चित केली जाते. आपणही न चुकता सभेला हजर रहा व कामकाजात भाग घ्या. आपले स्वागत आहे.

## आगामी उपक्रम

१) गरीब वधुवरांचे समाजातर्फे विवाह लावून देणे - प्रत्येक वर्षी समाजातील गरीब व माता-पित्यांचे छत्र नसलेल्या किमान ४ वधु-वरांचे विवाह सो.आ.क्ष.समाज कल्याण तर्फे संपन्न करणे.

२) **वैद्यकीय खर्चास हातभार** - गरीब व दुर्बल समाजबांधवांना वैद्यकीय खर्चासाठी मदत करणे.

३) **कल्याण समाजाचे उत्पन्न वाढविणे** - कल्याण समाजाचे उत्पन्न वाढेल या उद्देशाने मुरलीधर मंदिर व चिकणघर येथील मिळकती ताब्यात आल्यावर त्या विकसीत करणे. समाजासाठी सर्व सोयींनी युक्त हॉल बांधणे. या मिळकतींचे जतन, संवर्धन व वाढ करणे.

४) सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजासाठी निस्वार्थाचे विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवाच्या कार्याचा गौरव म्हणून काही पुरस्कार देण्याचा मानस आहे.

ट्रस्टच्या दैनंदिन कार्यासाठी, मुरलीधर मंदिरासाठी, कल्याण दिवाणी न्यायालयात गेली २७ वर्षे सुरू असलेल्या न्यायालयीन प्रक्रियेचा खर्च, मुरलीधर मंदिर येथील समाजाच्या कार्यालयाच्या कामाचा कार्यालयीन खर्च (उदा.वीज बील, टेलीफोन बील, कॉम्प्युटर, इंटरनेट व पोस्ट आणि स्टेशनरी इत्यादी ) भरपूर असतो. हा सर्व खर्च भागविणे कल्याण समजाला सध्या जड जात आहे.

कल्याण समजाला देणगी देणाऱ्या देणगीदारांना कर सवलत मिळावी म्हणून समाज ट्रस्टतर्फे आयकर खात्याकडे ८० जी. मिळावा म्हणून प्रस्ताव प्रस्तावित आहे. तसेच परदेशस्थ ज्ञाती-बांधवांना व हितचिंतकांना समाजाला देणगी देणे सुलभ व्हावे म्हणून



आवश्यक असलैली अनुमती मिळावी म्हणून लवकरच केंद्र सरकारकडे अनुमती मागणार आहेत.

## आवाहन

सो.आ.क्ष समाज ट्रस्ट कल्याण हा संपूर्ण भारतातील इतर समाज बांधवांसाठी आदर्श उदाहरण ठरण्यासाठी व समाजाची वर उल्लेखीत कार्ये पार पाडण्यास ट्रस्टची आर्थिक सुधारणा होणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण एवढे करू शकता.

१) आजीव सभासद -

आपल्या कुटुंबातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींनी रु.१५००/- एकदम अथवा टप्प्या टप्प्याने भरून समाजाचे आजीव सभासदत्व घ्यावे. हे पैसे खर्च न करता Fixed Deposit म्हणून बँकेत ठेवले जातात.

या ठेवींवर मिळालेल्या व्याजातून मुरलीधर मंदिर व कार्यालयाचा दैनंदिन खर्च भागविण्यास अल्प प्रमाणात मदत होते.

२) देणगी -

सध्याच्या कोर्ट केसेस करीता सुमारे ३ लाख रुपयांची अत्यंत तातडीची गरज आहे तरी आपल्या इच्छेनुसार एक रकमी देणगी आपण समाजाला द्यावी. अथवा दरमहा ठराविक रक्कम समाजासाठी द्यावी. जेणे करून न्यायालयीन कामकाज सुलभरीत्या पार पाडता येईल. त्वरीत देणगी देण्याचे आपणांस आवाहन करतो.

३) आपल्या उत्पन्नापैकी किमान २% उत्पन्न समाजकार्यासाठी समाजाकडे जमा करावी.

४) गरीब,माता-पिता नसलेल्या वधु-वरांचे विवाह करून देण्यास, आपल्या इच्छेनुसार किमान रु. १००/- प्रत्येक विवाहासाठी किंवा त्याहून जास्त रक्कम समाज ट्रस्टकडे जमा करावी.

५) समाजाच्या सर्वांगीण विकासाठी, उन्नती, प्रगतीसाठी आपल्या कांही सूचना, विचार असतील तर त्या आपण लेखी स्वरूपात नि:संकोचपणे कार्यालयात देऊ शकता. चांगल्या सूचनांचे नेहमीच स्वागत आहे. मासिक सभेत त्याचा विचार केला

जाईल व योग्य असल्यास निश्चितच स्विकारल्या जातील.

शेवटी अत्यंत महत्वाचे की कल्याण समाज ट्रस्टचा आर्थिक जमा-खर्च दरवर्षी चार्टर्ड अकौंटंट द्वारा संमत करून घेऊन वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडला जातो. त्यावर सभागृहात चर्चा होऊन तो स्विकारला जातो व नंतर प्रत्येक सदस्याला छापिल अहवाल दिला जातो. हा जमाखर्च व अहवाल धर्मादाय आयुक्तांकडे दरवर्षी पाठविला जातो. ट्रस्ट संबंधी सर्व कायद्यांचे व नियमांचे काटोकोरपणे पालन केले जाते.

सो.आ.क्ष समाज ट्रस्ट, कल्याण आपल्या सर्वच व्यवहारात कसोशीने पारदर्शकता ठेवून आहे.

समाजाच्या उन्नती, प्रगतीसाठी आपल्या यथाशक्ती योगदानाची अपेक्षा ठेवून आहोत.

आपले नम्र

**ॲड.श्री.मोहनराव नरसिंगराव पिंपळे**

(अध्यक्ष व प्रमुख विश्वस्त)